# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मेसचा अन्न परवाना निलंबित

पुणे दि.१७ (प्रतिनिधी)- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील मध्यवर्ती भोजनगृह (रिफेक्टरी) चालविणाऱ्या मे. श्री स्वामी समर्थ भोजनालय अँड केटरिंग सर्व्हिसेस या आस्थापनेचा अन्न परवाना पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा विभागाच्या तपासणीत अनेक गंभीर त्रुटी आणि अन्न सुरक्षिततेला बाधा आणणाऱ्या अनियमितता आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी १६ जून २०२६ रोजी भोजनगृहाची तपासणी केली असता अन्न साठवणूक, तापमान नियंत्रण, स्वच्छता आणि अन्न हाताळणीच्या प्रक्रियेमध्ये गंभीर त्रुटी असल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे ठेवण्याबाबत आवश्यक खबरदारी घेतली जात नसल्याचे आढळले. तसेच अन्नपदार्थांच्या सुरक्षित साठवणुकीसाठी आवश्यक तापमान नियंत्रणाची प्रभावी व्यवस्था नसल्याचेही स्पष्ट झाले. याशिवाय भोजनगृहात कीटक प्रतिबंधक उपाययोजनांचा अभाव, अपुरी स्वच्छता व्यवस्था, कीटक नियंत्रणातील त्रुटी, पाण्याच्या गुणवत्तेबाबत आवश्यक अभिलेख उपलब्ध नसणे आणि अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीचे नोंदवही अभिलेख नसणे अशा अनेक बाबी आढळून आल्या. या सर्व त्रुटींमुळे अन्नाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून ग्राहकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.


(वर्ष ६५ वे अंक १५७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.१८ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# उद्धव ठाकरेंचे सहा खासदार फुटले? ऑपरेशन टायगरने खळबळ

## शिंदेंसोबत सहा खासदार नाहीत, ठाकरेंच्या शिवसेनेला विश्वास
## ठाकरेंच्या शिवसेनेकडून व्हिप जारी, आज खासदारांची तातडीची बैठक

नवी दिल्ली दि.१७ (वृत्तसंस्था)- महाराष्ट्रातील राजकारणात ऑपरेशन टायगरने पुन्हा चर्चेला उधाण आणले आहे. उद्धव ठाकरेंकडील ९ खासदारांपैकी ६ खासदारांनी वेगळा गट बनवल्याचा दावा केला जात आहे. या गटाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मान्यता दिल्याचे सांगितले जाते. मात्र आता या घडामोडीला नवं वळण लागले आहे. ६ खासदारांपैकी २ खासदारांनी वेगळ्या गटासाठी सह्या केल्या नाहीत असा दावा करण्यात येत आहे. उद्या ११ वाजता उद्धवसेनेने संसदीय पक्षाची बैठक बोलावली आहे. या बैठकीसाठी व्हीप जारी करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात ऑपरेशन टायगर यशस्वी झाले की नाही हे संसदीय पक्षाच्या बैठकीतून समोर येणार आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे संसदेतील गटनेते अरविंद सावंत यांनी उद्याच्या बैठकीसाठी व्हीप जारी केला आहे. या बैठकीला पक्षाचे संसदेतील सर्व खासदार उपस्थित राहण्याचे निर्देश दिलेत. ठाकरेंचे ६ खासदार फुटले अशी चर्चा सगळीकडे सुरू आहे. त्यातच सर्व खासदार उद्याच्या बैठकीला येतील असा विश्वास ठाकरेंना आहे. याबाबत खासदार संजय राऊत म्हणाले की, आम्ही संसदीय पक्षाची बैठक बोलावली आहे. त्यासाठी व्हीप जारी केला आहे. मुख्य प्रतोद अनिल देसाई, गटनेते अरविंद सावंत यांनी पत्र जारी केले आहे असं त्यांनी सांगितले.

तर कायदेशीर बाबी म्हणून आम्ही लोकसभा अध्यक्षांना पत्र पाठवले आहे. सकाळी पत्रकार परिषद घेतली आहे. पक्षाच्या खासदारांनी बैठकीला यावे यासाठी व्हीप जारी केला आहे. त्यातून या चर्चेवर एकदा पडदा पडावा. नेमके किती लोक आहेत किंवा नाही हे बैठकीतून कळणार आहे. उगाच संशय व्यक्त का करायचा, आमचे खासदार आहेत, आम्ही कुणावरही संशय व्यक्त करत नाही. परंतु जे बाहेर ऐकतोय ते दुर्दैवाने घडत असेल तर आमचे पत्र कायदेशीर बाब म्हणून दिले आहे असं अरविंद सावंत यांनी म्हटलं आहे. ६ पैकी काही खासदार उद्याच्या बैठकीला येतील असा विश्वास ठाकरेंच्या नेत्यांना आहे.

अशी ही बातमी समोर येत आहे की, संजय दिना पाटील आणि ओमराजे निंबाळकर यांचे दोन्ही मतदारसंघ भाजपचे असल्यानं २०२९ साली होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत या दोघांचंही राजकीय भवितव्य धोक्यात येऊ शकतं. त्यामुळेच या दोन्ही खासदारांना भाजपच्या नेत्यांकडून शब्द हवा आहे. २०२९ सालच्या निवडणुकीत आपल्यालाच तिकीट मिळेल असा शब्द त्यांना भाजपच्या नेत्यांकडून हवा आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, फुटीच्या उंबरठ्यावर असलेल्या नेत्यांशी भाजपने संवाद सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शिंदेंनी सुरू केलेलं हे ऑपरेशन टायगर पूर्णत्वास नेण्यासाठी भाजपच्या नेत्यांचा शब्द गरजेचा आहे. त्या दृष्टीने भाजपच्या नेत्यांनी प्रयत्न सुरू केल्याची माहिती समोर येत आहे.

ईशान्य मुंबईचे खासदार संजय दीना पाटील यांच्यासमोर भाजपच्या मिहीर कोटेचा यांचं आवाहन आहे. त्यामुळे २०२९ च्या निवडणुकीत आपल्यालाच (पान ४ वर)

### मी पुण्यातच, दिल्लीला गेलो नाही-ओमराजे निंबाळकर

'ऑपरेशन टायगर'मध्ये धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव समोर आल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. निवडणुकीच्या काळात कोणत्याही परिस्थितीत उद्धव ठाकरेंसोबत शेवटपर्यंत राहण्याच्या आणाभाका घेणाऱ्या ओमराजेंचे नाव या संभाव्य पक्षांतराच्या चर्चेत आल्यामुळे, त्यांचे जुने व्हिडीओ व्हायरल करत त्यांना राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर ट्रोल केले जात आहे.

दरम्यान, या सर्व राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ओमराजे निंबाळकर यांनी 'ऑपरेशन टायगर'वर आपली पहिली प्रतिक्रिया दिली असून, 'मी सध्या पुण्यातच आहे,' असे स्पष्ट करत या चर्चांना बगल देण्याचा प्रयत्न केला आहे. ओमराजे निंबाळकर म्हणाले, मी दिल्लीला गेलो नाही. मी पुण्यातच आहे. २० तारखेनंतर मी मीडियाला माझी भूमिका सांगणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे निंबाळकरांच्या शिवसेना शिंदे गटात प्रवेशाच्या चर्चेला तूर्तास अल्पविराम मिळाले आहे.

### ठाकरे गटाची बाजू ऐकून घ्यावी, राऊतांची मागणी

ठाकरे गटाने यापूर्वीच लोकसभा अध्यक्षांना पत्र देत कोणत्याही फुटीर गटाला स्वतंत्र मान्यता देण्यापूर्वी पक्षाची बाजू ऐकून घेण्याची मागणी केली होती. संसदीय पक्षनेते अरविंद सावंत यांच्या स्वाक्षरीने पाठवलेल्या पत्रात, ''शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हाच संसदेतील अधिकृत पक्ष मानला जावा आणि कोणत्याही फुटीर गटाला विशेष दर्जा किंवा मान्यता देऊ नये,'' अशी विनंती करण्यात आली होती. आता सहा खासदारांच्या गटाला मान्यता मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत स्वतः लोकसभा अध्यक्षांकडे उद्धवसेनेची भूमिका मांडणार असल्याचे समजते.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने मोठी पत्रकार परिषद घेऊन आपली आक्रमक भूमिका स्पष्ट केली आहे. अरविंद सावंत, अनिल देसाई, राजाभाऊ वाजे आणि संजय राऊत यांनी एकत्र येत बंडखोरीच्या चर्चांवर थेट कडक शब्दांत प्रहार केला. जर पुन्हा कोणी शिवसेना फोडण्याचा प्रयत्न केला, तर महाराष्ट्रातील जनता गप्प बसणार नाही, असा जाहीर इशारा यावेळी नेत्यांनी दिला. पत्रकार परिषदेत बोलताना खासदार संजय राऊत यांनी काल रात्रीच्या घडामोडींचा खुलासा केला. काल रात्री ११ वाजेच्या सुमारास मला एका विश्वासू सूत्राने माहिती दिली की, महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेण्याची मोठी डील झाली आहे. प्रत्येकी ५० कोटी रुपयांना खासदारांना विकत घेतले जात असून, काल रात्रीच १५ कोटींचा ॲडव्हान्स दिला गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली. मी ती लगेच सोशल मीडियावर जाहीर केली,'' असे राऊत म्हणाले.

## जे होतंय ते होऊ द्या, जे होणार आहे ते होणारच, उद्धवसाहेब डरो मत-भास्कर जाधव

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- उद्धवसाहेब घाबरून जाऊ नका, ही वेळ देखील निघून जाईल. जे होतंय ते होऊ द्या, जे होणार आहे ते होणारच आहे. हे दिवस निघून जाण्यासाठी आपल्याला कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. उद्धवसाहेब डरो मत.. अशा शब्दात शिवसेना ठाकरे गटाचे जेष्ठ नेते आणि आमदार भास्कर जाधव यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना धीर देत सल्ला दिला आहे. देशात फक्त आम्हालाच राहायचं आहे, अशा दृष्ट हेतूने कॉंग्रेसने कुठलाही पक्ष संपवण्याचे काम केलं नाही. ओम बिर्ला यांना कोणी काय पत्र दिलं हे माझ्यासाठी गौण विषय असल्याचेही भास्कर जाधव म्हणाले.

पक्षांतर बंदी कायदा संपवून टाका, मग देशात मजा येईल. असे म्हणत भास्कर जाधव यांनी सरकारला आव्हान दिल आहे. ज्यांच्या नावाने पक्षफुटीची चर्चा होतेय, त्यांनी जनाची नाही तर मनाची लाज बाळगली पाहिजे. अशी बोचरी टीकाही भास्कर जाधव यांनी केली आहे. पक्ष फोडून तुमच्या पक्षाची सूज वाढत असली तरी तुमच्या बद्दलचा समाजातला आदर रसातळाला जातोय. गळती रोखण्यात अपयश येतंय, असे म्हणता येणार नाही. पंधरा वर्ष ज्यांना ममता, प्रेम, पदे दिली ते पंधरा दिवस देखील टिकले नाहीत. फुटून जाणारा एखादा लोकप्रतिनिधी भाजपची आयडॉलॉजी आम्हाला मान्य, अथवा नेतृत्व मान्य असे कोणी म्हणत नाही. कोणीही विचारधारा किंवा नेतृत्व मान्य करून पक्ष सोडून जात नाहीये, असेही भास्कर जाधव म्हणेल. छळ वादातून सुटका होण्यासाठी किंवा छळ वादाला कंटाळून लोक जात आहेत असेही ते म्हणाले.

## ऑपरेशन टायगर भाजपचंच षडयंत्र; ६ खासदारांपैकी एकाला मंत्रीपद अन् १०० कोटींची ऑफर; अंजली दमानियांचा दावा

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत असून उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसलाय. एकनाथ शिंदेंकडून ऑपरेशन टायगर राबवण्यात येत असून उद्धवसेनेतील ६ खासदार फोडण्यात शिंदेसेनेला यश आलं आहे. या सहा बंडखोर खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करत लोकसभा अध्यक्ष यांना शिंदे त्याला पाठिंबा देत असल्याचे पत्र दिलं. पक्षांतर बंदी कायद्यानुसार लागणारे दोन तृतीयांवर खासदार फुटल्यामुळे या गटातील खासदारांवर कोणतेही कारवाई होऊ शकत नाही. या घडामोडीमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

या सगळ्या प्रकारावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानीया यांनी एकनाथ शिंदेंचा वापर होतोय; ऑपरेशन टायगर भाजपचंच षडयंत्र असल्याचं सांगत या सहापैकी एका खासदाराला मंत्रीपदाची आणि १०० कोटींची ऑफर असल्याचा दावाही त्यांनी केला.

''आज जे घडलं आहे, ते पाहून राग आला आहे. मी उबाठाची समर्थक नाही तरीसुद्धा हे पाहुन मन आस्वस्थ झालं आहे. मत दिलं तरी कशाला असा प्रश्न पडतोय.ओम राजे निंबाळकर हे एका होटेलमध्ये बसून हे सगळे दिलेली मत विकतात हे अतिशय वाईट गोष्ट आहे.ज्या शिंदे गटाला नाकारलं आणि ठाकरे गटाच्या व्यक्तीला खासदार बनवलं. हे जर लोकशाही विकत असतील त्याचे तीन तेरा वाजवत असतील तर हे खूप चुकीचं आहे. शिंदेंचा वापर होत आहे.हे त्यांना कळत नाही. हे अप्रत्यक्षपणे भाजपचं हे एक षडयंत्र आहे. त्यांना जी बिले आणायची आहेत, त्यासाठी त्यांना लोकसभेत आणि राज्यसभेत त्यांचे आमदार आणि खासदार हवे आहेत.त्यासाठी केलेला हा सगळा खटाटोप आहे. भाजपचं यासागळ्याशी नक्कीच घेणे देणं आहे. हे सगळे खासदार स्पीकरला भेटल्यानंतर अमित शहांना कशासाठी भेटणार होते. त्यांना सांगण्यात आलं होतं की, सहा खासदारांपैकी एकाला मंत्रीपद आणि १०० कोटी देणार होते. कुठून येणार हे पैसे? केंद्राकडून पैसे आल्याशिवाय आणि आश्वासन मिळाल्याशिवाय हे शक्य नाही.''

त्या पुढे म्हणाल्या,''ठाकरे, पवार यांच्या विरोधात मी लढलेली आहे पण आताच्या गोष्टी पाहता, पक्ष सोडा, लोकशाही त्यात आहे त्यामुळे या दोन्ही पक्षांनी आतातरी डोळे उघडावे. या सहा खासदारांच्या ठिकाणी या दोन्ही पक्षांनी लोकांचा मत कलेक्ट करुण पीआयएल करावी. हे जर असंच सुरु राहिलं तर ५० वर्ष भाजपचं सरकार राहिल. यात काडीमात्र शंका नाही. त्यांच्याशिवाय कोणीही उरणार नाही. लोकशाही वाचवण्यासाठी आंदोलन केलं पाहिजे असं अंजली दमानिया म्हणाल्या.

## देशात हुकूमशाही आणण्याचा प्रयत्न; पृथ्वीराज चव्हाणांचा भाजपवर गंभीर आरोप



मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांच्या बंडामुळे राज्यातील राजकारण ढवळून निघाले असतानाच माजी मुख्यमंत्री आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. ठाकरे गटातील फूट ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून देशात विरोधी पक्ष कमकुवत करण्याच्या मोठ्या राजकीय रणनीतीचा भाग असल्याचा दावा त्यांनी केला. तर दुसरीकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनीही या घडामोडींना ''ऑपरेशन बाजार'' असे संबोधत सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरेंच्या पक्षातील सहा खासदारांनी स्वतंत्र गटाच्या दिशेने पाऊल टाकल्याने महाविकास आघाडीत चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांशी संवाद साधताना भाजपवर निशाणा साधला.

राज्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चेबाबत (पान ४ वर)

## कॉंग्रेस भाजपची 'ए टू झेड' टीम, प्रकाश आंबेडकरांची टीका

### कॉंग्रेसला भाजपला हरवण्यात नव्हे, तर सौदेबाजीत रस असल्याचा आरोप

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी भाजप आणि कॉंग्रेसवर गंभीर आरोप करत टीका केली आहे. भाजप आणि कॉंग्रेस एकच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. याविषयी बोलताना त्यांनी नांदेड मतदारसंघातील उदाहरण देखील दिले आहे. तसेच कॉंग्रेस भाजपची ए टु झेड टीम असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

प्रकाश आंबेडकर ट्विट करत म्हणाले, भाजप = कॉंग्रेस याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. नांदेड महानगरपालिकेच्या निवडणुकीतील कॉंग्रेसचे उमेदवार रामदास पाटील सुमठणकर होते. हे रामदास पाटील सुमठणकर कोण आहेत? हे तेच रामदास पाटील सुमठणकर आहेत, ज्यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे हिंगोली लोकसभा प्रभारी म्हणून काम पाहिले होते. त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्जही दाखल केला होता, परंतु भाजपचे गिरीश महाजन आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर तो मागे घेतला.

पुढे प्रकाश आंबेडकर म्हणाले, याचा अर्थ असा की, नांदेड कॉंग्रेसची पहिली पसंती भाजपशी घनिष्ठ संबंध असलेल्या व्यक्तीला होती. वंचित बहुजन आघाडीच्या नांदेड टीमने कॉंग्रेसला वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत इंगोले यांना पाठिंबा देण्याची विनंती केली होती. कॉंग्रेसने नकार दिला. त्याऐवजी, कॉंग्रेसने शिवसेना (यूबीटी) चे उमेदवार कृष्णा पाटील यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला.

हे कृष्ण पाटील कोण आहेत? ते हिंगोलीचे खासदार नागेश पाटील (पान ४ वर)

## उबाठा संपवण्याचा विडा संजय राऊतांनी उचलला-प्रतापराव जाधव

नवी दिल्ली दि.१७ (वृत्तसंस्था)- शिवसेना ठाकरेंच्या पक्षाचे सहा खासदार हे शिवसेना एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात होती. त्या चर्चेवर आज शिक्कामोर्तब झालं आहे. ठाकरे गटाचे सहा खासदार फुटले आहेत. यावरुन शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांनी फुटीर खासदारांवर जोरदार टीका केली आहे. यावर शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री प्रतापराव जाधव यांनी खासदार संजय राऊतांवर जोरदार टीका केली आहे. संजय राऊत आम्हाला धमक्या देणार, आम्ही मर्द आहोत आम्हाला धमक्या देण्यापेक्षा त्यांनी आपलं घर संभाळावं. स्वतःचं घर सांभाळता येत नाही म्हणून दुसऱ्याच्या घरावर दगडं फेकण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये, अशी टीका जाधव यांनी संजय राऊतांवर केली.

मूळात जे सुरु आहे हे संजय राऊतांचे पाप आहे. उबाठा संपवण्याचा विडा हा सर्वात जास्त संजय राऊत यांनीच उचलला आहे अशी टीका जाधवांनी केली. उलट संजय राऊत आज जास्त खूष असतील कारण त्यांच्या मनासारखे (पान ४ वर)

## ऑपरेशन टायगर नव्हे, ऑपरेशन गिधाड

### नाना पटोले-वडेट्टीवारांचा भाजपवर थेट हल्लाबोल

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील ऑपरेशन टायगरवरून कॉंग्रेसचे नेते नाना पटोले यांनी भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन गिधाड आहे, असे म्हणत त्यांनी सत्तेसाठी सुरू असलेल्या राजकीय हालचालींवर निशाणा साधला. लोकशाही व्यवस्थेत जनता पक्षाला मत देते, मात्र सत्ताधारी इतर पक्षांतील निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना आपल्या बाजूने वळवून सत्तेचा माज दाखवत असल्याचा आरोप त्यांनी केला.

नाना पटोले म्हणाले, सत्तेची भूक असावी, पण मोदी आणि त्यांच्या आघाडीने ती मर्यादाही ओलांडली आहे. लोकशाही व्यवस्थेची हत्या करण्याचे काम सुरू आहे. तसेच लोकसभा अध्यक्षांच्या स्वायत्ततेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत, स्पीकरही मोदी-शहा सांगतील तेच करतात, असा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पटोलेंचे हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.

संजय राऊत यांनी काही खासदारांना पक्ष सोडण्यासाठी मोठ्या आर्थिक ऑफर दिल्या जात असल्याचा दावा केला होता. त्याबाबत विचारले असता नाना पटोले म्हणाले की, ''ते यापेक्षाही अधिक पैसे देऊ शकतात. कारण या लोकांनी देश लुटला आहे.'' भाजपवर निशाणा साधताना त्यांनी (पान ४ वर)

## करार मला पसंत पडला नाही तर थेट बॉम्ब टाकू-डोनाल्ड ट्रम्प

वॉशिंग्टन दि.१७ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराण यांच्या युद्धबंदीच्या ऐतिहासिक कराराची घोषणा झाली आहे. या करारावर शुक्रवारी स्वाक्षरी होणार आहे. पण, करारावर सही होण्यापूर्वीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे. ''करार मला पसंत पडला नाही किंवा त्यांनी व्यवस्थित वर्तन केले नाही तर पुन्हा इराणवर बॉम्ब वर्षाव करणार'', असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. फ्रान्समध्ये जी७ सदस्य देशांच्या बैठकीत बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी करारावर भाष्य केले.

चार महिन्याच्या संघर्षानंतर आणि प्रदीर्घ वाटाघाटीनंतर अखेर अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता करारावर एकमत झाले आहे. करारामध्ये युद्धबंदीचा कालावधी वाढवणे आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. शुक्रवारी (१९ जून) दोन्ही देशांमध्ये स्वित्झर्लंडमध्ये करारावर स्वाक्षरी होणार आहे. यापूर्वीच डोनाल्ड ट्रम्प (पान ४ वर)

## रविकांत तुपकरांच्या आंदोलनाचा विविध ठिकाणी उद्रेक!

### शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न; संतप्त आंदोलकांनी रस्त्यावर फेकला भाजीपाला

बुलढाणा दि.१७ (प्रतिनिधी)- शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या सरसकट कर्जमुक्तीसाठी सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाने आज तिसऱ्याच दिवशी धोकादायक आणि हिंसक वळण घेतले! जिल्हाभरात आंदोलनाचा वणवा भडकला असतानाच बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एका संतप्त तरुण शेतकऱ्याने अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून आणि झडप घालून ताब्यात घेतल्याने संभाव्य भीषण अनर्थ टळला.

आज बुधवारी, दुपारी तीन वाजताच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ॲड. शर्वरी तुपकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी जमले होते. जिल्हाधिकाऱ्यांना सातबाऱ्याचे वाण देण्यासाठी पाच जणांचे शिष्टमंडळ चर्चेसाठी कार्यालयात गेले. यावेळी बाहेर उभ्या असलेल्या





क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी आंदोलकांना पोलिसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य द्वारावरच रोखून धरले. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी एकाएकी रस्त्यावर दूध, कांदे, टोमॅटो आणि विविध भाजीपाला फेकत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. काही वेळातच जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील परिसर भाजीपाल्याच्या चिखलाने भरून गेला.

याच गोंधळात गर्दीतून पुढे आलेल्या विठ्ठल खेडेकर (राहणार अंत्री खेडेकर, तालुका चिखली, जिल्हा बुलढाणा ) या तरुण शेतकऱ्याने स्वतःच्या अंगावर डिझेल ओतून घेतले. यामुळे तिथे एकच गोंधळ (पान ४ वर)

## मान्सून कमजोर, देशाच्या ४०टक्के भागात पावसाची कमतरता

नवी दिल्ली दि.१७ (वृत्तसंस्था)- जूनच्या तिसऱ्या आठवड्यातही मान्सूनने देशाचा मोठा भाग व्यापलेला नाही. १७ जूनच्या सकाळी घेतलेल्या उपग्रह चित्रांमध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि कर्नाटकवर मान्सूनचे ढग नाहीत. या राज्यांमध्ये आकाश निरभ्र दिसत आहे.

हवामान विभागाच्या मते, देशातील ७२३ जिल्ह्यांपैकी केवळ १०३ जिल्ह्यांमध्येच सामान्य पाऊस झाला आहे. म्हणजेच, देशाच्या ४०% भागात सामान्यपेक्षा कमी पाऊस झाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बंगालच्या उपसागरात मजबूत कमी दाबाचे क्षेत्र तयार न होणे हे आहे.

४ जून रोजी केरळममध्ये दाखल झाल्यानंतर मान्सून १३ दिवसांत १९ राज्यांपर्यंत पोहोचला आहे. गेल्या ७ दिवसांपासून तो तेलंगणातील भद्राचलम येथे अडकून पडला आहे. यामुळेच छत्तीसगड, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात पावसाला उशीर झाला आहे.

# झाशीची राणी लक्ष्मीबाई म्हणजेच तळपत्या सुर्याचा प्रकाश

आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन -दोन हात केले यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे.झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी (वाराणसी ) येथे १९ नोव्हेंबर १८३५ ला झाला. लक्ष्मीबाईचे मुळ नाव मणिकर्णिका होते. लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते. नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली.परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षांच्या होत्या. तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला. लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरूध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या.७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले.ब्रिटीश अधिकारी ?लिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर तळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि 'मी झाशी देणार नाही' असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले. सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला. परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले. यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला केला आणि राणीचा पराभव झाला.या पराभवानंतर रावसाहेब पेशवे,बांद्याचे नवाब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर महत्वाचे सैनिक गोपाळपूरला जमले. यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला. लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले.१८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले.२२ में १८५८ च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३० - ३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या.तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरू ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली.अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ 'कोटा की सराय' येथे येऊन पोहोचला व त्यांने त्वरित हल्ला चढवला.अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या.विजेसारख्या तळपर्णाया राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकांमध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटुन काढले.अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते.परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली.अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या.थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा 'राजरत्न' नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला.नेहमीचा 'सारंगी'नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता.अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या.परंतु पुरूषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले.घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले.आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनविन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली.अशा प्रकारे महान योध्द्या राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करून वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली.जोपर्यंत सुर्य -चंद्र, आकाश -पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे नाव अमर राहील.देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई याची प्रेरणा निरंतर आपल्या हृदयात रहावी यासाठी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त देशात वृक्ष लागवड व्हायला हवी.कारण असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत, फुलात, फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल. राणी लक्ष्मीबाईना माझा कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

# महाराणा प्रताप : राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक

**भारतीय** इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि योद्धे होऊन गेले. काहींनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर मोठी साम्राज्ये उभी केली, तर काहींनी प्रशासन, संस्कृती आणि लोककल्याणाच्या माध्यमातून आपले वेगळेपण सिद्ध केले. परंतु केवळ पराक्रमामुळे नव्हे, तर स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम आणि अदम्य जिद्दीमुळे जनमानसात अजरामर ठरलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराणा प्रताप. भारतीय संस्कृतीत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या वीरांची परंपरा आहे. या परंपरेतील तेजस्वी नाव म्हणून महाराणा प्रताप यांचा उल्लेख केला जातो. मेवाडच्या या महान राजाने कोणत्याही प्रकारच्या परकीय अधिपत्यापुढे झुकण्यास नकार दिला आणि जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यामुळेच आजही त्यांचे जीवनचरित्र प्रेरणेचा अखंड झरा मानले जाते.

भारतातील अनेक भागांत तिथीनुसार महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदा १७ जून रोजी तिथीनुसार महाराणा प्रताप जयंती साजरी होत आहे. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा नसून स्वाभिमान, त्याग, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पुनर्स्मरण करण्याचा आहे.

महाराणा प्रताप यांचा जन्म राजस्थानमधील कुंभलगड येथे झाला. त्यांचे वडील महाराणा उदयसिंह द्वितीय हे मेवाडचे शासक होते, तर माता जयवंता बाई यांनी प्रताप यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कारांची समृद्ध छाप उमटविली. बालपणापासूनच प्रताप यांच्यात निर्भयता, शौर्य आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. तलवारबाजी, घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि युद्धकौशल्य यांचे शिक्षण त्यांनी अत्यंत निष्ठेने घेतले. राजपुत्र म्हणून त्यांना राजवैभवाचा अनुभव मिळाला; परंतु पुढील आयुष्यात त्यांनी वनवास, दारिद्र्य आणि संघर्ष यांचाही तितक्याच धैर्याने स्वीकार केला.

सोळाव्या शतकातील भारताच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता मुघल साम्राज्याचा विस्तार वेगाने होत होता. सम्राट अकबराने विविध राजपूत संस्थानांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक राजपूत राजांनी मुघल अधिपत्य स्वीकारले; परंतु मेवाडचे स्वातंत्र्य टिकविण्याचा निर्धार महाराणा प्रताप यांनी केला. मेवाड हा केवळ एक प्रदेश नव्हता, तर तो राजपूत स्वाभिमानाचे प्रतीक होता. त्यामुळे मेवाडच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणे प्रताप यांना मान्य नव्हते.

इ.स. १५७२ मध्ये महाराणा प्रताप यांचा मेवाडच्या सिंहासनावर राज्याभिषेक झाला. त्या वेळी मेवाड अनेक संकटांनी वेढलेला होता. चित्तौडगड आधीच मुघलांच्या ताब्यात गेला होता. राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत होती आणि अनेक भागांवर बाह्य दबाव होता. अशा कठीण परिस्थितीत प्रताप यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली. त्यांनी आपल्या प्रजेचा विश्वास संपादन केला आणि मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अखंड संघर्ष करण्याचा संकल्प केला.

अकबराने अनेक वेळा दूत पाठवून महाराणा प्रताप यांना मुघल अधिपत्य स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला. परंतु प्रताप यांनी स्वाभिमानाशी तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्यासाठी राज्यापेक्षा स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे होते. ते म्हणत असत की परकीय अधीनतेत वैभवशाली जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना कष्ट सहन करणे अधिक श्रेष्ठ आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे ते भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अग्रगण्य प्रेरणास्रोत ठरतात.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील सर्वाधिक प्रसिद्ध घटना म्हणजे हळदीघाटीची लढाई. १५७६ मध्ये मेवाड आणि मुघल सैन्य यांच्यात हळदीघाटी येथे भीषण युद्ध झाले. मुघल सैन्याचे नेतृत्व आमेरचे राजा मानसिंह करत होते, तर महाराणा प्रताप स्वतः आपल्या सैन्याचे नेतृत्व करत होते. संख्येने मुघल सैन्य अधिक बलवान असले, तरी मेवाडच्या सैनिकांनी अद्भुत शौर्याचे दर्शन घडविले. या युद्धात महाराणा प्रताप यांचा प्रिय घोडा चेतक याने दाखविलेली निष्ठा आणि पराक्रम आजही लोककथांचा विषय आहे.



चेतक हा केवळ घोडा नव्हता, तर महाराणांचा विश्वासू सहकारी होता. युद्धादरम्यान गंभीर जखमी होऊनही त्याने महाराणांना सुरक्षित स्थळी पोहोचविले. अखेरीस त्याचा मृत्यू झाला. चेतकाच्या निष्ठेची कथा भारतीय जनमानसात आजही भावनिक आदराने सांगितली जाते. महाराणा प्रताप आणि चेतक यांचे नाते हे माणूस आणि प्राणी यांच्यातील स्नेह, विश्वास आणि समर्पणाचे अद्वितीय उदाहरण मानले जाते.

हळदीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे संघर्षमय जीवन अधिक कठीण बनले. त्यांनी अरवली पर्वतरांगांमध्ये आश्रय घेतला. कुटुंबासह त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. दंतकथांनुसार त्यांच्या कुटुंबाला अनेकदा उपासमारीची वेळ आली. जंगलात राहून त्यांनी आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ज्योत कायम ठेवली. संकटांनी खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने सैन्य संघटित केले आणि गनिमी काव्याच्या तंत्राचा प्रभावी वापर केला. महाराणा प्रताप यांच्या संघर्षात भामाशाह यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भामाशाह हे महाराणांचे विश्वासू सहकारी होते. त्यांनी आपल्या संपत्तीचा मोठा भाग महाराणा प्रताप यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण केला. या आर्थिक मदतीमुळे महाराणांना सैन्याची पुनर्बांधणी करता आली. राष्ट्रहितासाठी संपत्तीचा त्याग करण्याची प्रेरणा भामाशाह यांच्या उदाहरणातून मिळते. महाराणा प्रताप हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले प्रशासकही होते. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. प्रजेच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. शेती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला. जंगलांमध्ये आणि डोंगराळ भागातही प्रशासन प्रभावीपणे चालविण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय होती. त्यांच्या राज्यकारभारातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्वधर्मसमभाव. महाराणा प्रताप यांनी विविध समाजघटकांना आपल्या संघर्षात सहभागी करून घेतले. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांतील लोक होते. हकीम खान सूर यांच्यासारख्या मुस्लिम योद्ध्यांनीही मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केले. यावरून महाराणा प्रताप यांची राष्ट्रकल्पना ही धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होती, हे स्पष्ट होते. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून आत्मसन्मानाचे महत्त्व अधोरेखित होते. आजच्या भौतिकवादी युगात अनेकदा तत्त्वांशी तडजोड करण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा वेळी प्रताप यांचे जीवन आपल्याला मूल्यांशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा देते. त्यांनी संकटांना घाबरून माघार घेतली नाही. अपयश आले तरी संघर्ष सोडला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही जिद्द आणि चिकाटी आजच्या तरुण पिढीसाठी विशेष मार्गदर्शक ठरते.

इतिहासात अनेकदा युद्धांच्या निकालावरून व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन केले जाते; परंतु महाराणा प्रताप यांच्या बाबतीत तसे घडत नाही. हळदीघाटीच्या युद्धात निर्णायक विजय मिळाला नसला, तरी त्यांनी स्वातंत्र्याचा लढा अखंड सुरू ठेवला. पुढील काळात त्यांनी मेवाडमधील अनेक प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. चावंड येथे त्यांनी नवी राजधानी स्थापन केली आणि राज्याची पुनर्बांधणी केली. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन केवळ युद्धाच्या निकालावर नव्हे, तर त्यांच्या अटळ संघर्षावर केले पाहिजे. महाराणा प्रताप यांच्या चरित्राचा प्रभाव साहित्य, लोककला आणि जनमानसावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. राजस्थानातील लोकगीतांमध्ये त्यांच्या शौर्याचे वर्णन आढळते. अनेक कवी, लेखक आणि इतिहासकारांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. श्यामनारायण पांडे यांच्या 'हल्दीघाटी' या काव्यातून महाराणांच्या पराक्रमाचे प्रभावी चित्रण केले गेले आहे. विविध भाषांमधील साहित्यकृतींनी त्यांच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही महाराणा प्रताप यांचे उदाहरण प्रेरणादायी मानले गेले. परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेतली. स्वराज्य, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची भावना जागृत करण्यासाठी त्यांच्या जीवनाचा उल्लेख केला जात असे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत आदर्श व्यक्तिमत्त्वांची गरज असते आणि महाराणा प्रताप हे त्यापैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे. आजच्या काळात महाराणा प्रताप जयंती साजरी करताना केवळ मिरवणुका, पुष्पहार आणि औपचारिक कार्यक्रम यांपुरते मर्यादित राहणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा समाजजीवनात अंगीकार होणे आवश्यक आहे. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे, तर स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होय. राष्ट्रभक्ती म्हणजे इतरांविषयी द्वेष नव्हे, तर देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याची वृत्ती होय. त्याग म्हणजे केवळ भौतिक वस्तूंचा त्याग नव्हे, तर सामूहिक हितासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवण्याची तयारी होय. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून या मूल्यांचे शिक्षण मिळते.

तरुण पिढीसमोर आज अनेक आव्हाने आहेत. स्पर्धात्मक जीवनशैली, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, मूल्यांमधील बदल आणि करिअरची धडपड या सर्वांमध्ये आत्मविश्वास आणि नैतिकतेचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत महाराणा प्रताप यांचे जीवन युवकांना प्रेरणा देऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीतही ध्येयाप्रती निष्ठा राखणे, परिश्रम करण्यास तयार राहणे आणि संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य बाळगणे ही शिकवण त्यांच्या चरित्रातून मिळते. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महाराणा प्रताप यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी विविध समाजघटकांना एकत्र आणून स्वातंत्र्यलढा उभारला. आज विविधतेने नटलेल्या भारताला सामाजिक सलोखा, परस्पर आदर आणि एकात्मतेची गरज आहे. मतभेद असले तरी राष्ट्रीय हित सर्वोच्च मानण्याची वृत्ती समाजात रुजली पाहिजे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून ही प्रेरणा मिळते.

इतिहासाचा अभ्यास करताना व्यक्तिपूजेला बळी पडणे योग्य नाही; परंतु महान व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा लेखाजोखा नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्य घडविणारा मार्गदर्शक असतो. महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी धैर्य, आत्मविश्वास आणि मूल्यनिष्ठा यांच्या बळावर संकटांवर मात करता येते.

महाराणा प्रताप यांचे निधन १५९७ मध्ये झाले. मृत्यूपूर्वीही त्यांनी मेवाडच्या स्वातंत्र्याची चिंता व्यक्त केली होती, असे सांगितले जाते. आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी मातृभूमीप्रती निष्ठा कायम ठेवली. त्यांच्या पश्चातही त्यांच्या संघर्षाची परंपरा जिवंत राहिली. आज अनेक स्मारके, पुतळे आणि ऐतिहासिक स्थळे त्यांच्या स्मृती जागवितात; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचे स्मरण समाजाच्या चेतनेत कायम राहणे आवश्यक आहे. महाराणा प्रताप जयंती हा केवळ एका राजाचा जन्मदिन नाही, तर तो भारतीय स्वाभिमानाचा उत्सव आहे. या दिवशी आपण त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलूंचे स्मरण करून स्वतःला अधिक जबाबदार नागरिक बनविण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, धैर्य, स्वातंत्र्यप्रेम आणि राष्ट्रसेवा ही मूल्ये आपल्या आचरणात उतरली, तरच महाराणा प्रताप यांना खरी आदरांजली वाहिली जाईल. आज भारत प्रगतीच्या नव्या वाटेवर वाटचाल करीत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. तथापि, या प्रगतीला नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. विकासासोबतच चारित्र्यनिर्मितीही महत्त्वाची आहे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून मिळणारी प्रेरणा या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी दाखवून दिले की भौतिक यशापेक्षा तत्त्वनिष्ठा अधिक मौल्यवान असते. महाराणा प्रताप यांचे चरित्र हे भारतीय संस्कृतीतील तेजस्वी अध्याय आहे. त्यांचा संघर्ष, त्याग आणि स्वाभिमान यांची गाथा पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा निर्धार करूया. कारण इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे स्मरण तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा त्यांच्या आदर्शांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसून येते. महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, संसाधने कितीही मर्यादित असली, तरी ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी अखंड प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही साध्य करता येतात. स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवणारा हा महान योद्धा भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करीत, तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या महाराणा प्रताप जयंतीनिमित्त सर्वांना प्रेरणा, ऊर्जा आणि राष्ट्रसेवेची नवी दिशा लाभो, हीच कृतज्ञ भावना व्यक्त करावीशी वाटते.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# क्रांतीदेवता राणी लक्ष्मीबाई

भारत मातेच्या पोटी अनेक रणरागिनी नी जन्म घेऊन भारत मातेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेली आहे व राष्ट्रनिष्ठा जपलेली आहे. अशा या महान योध्यात रणसंग्रामिनी क्रांती देवता म्हणून'झाशीची राणी -लक्ष्मीबाई' यांचे नाव अग्रस्थानी आहे. झाशीचे महाराज गंगाधरराव यांच्याशी त्यांचा विवाह झाल्यावर

त्या झाशी येथे गेल्या, तेथे त्यांनी घोडसवारी करणे, तलवार बाजीचा सराव, करणे आरंभ केले.राज्यकर्त्यांच्या अंगी असणाऱ्या प्रत्येक गुणांची झलक त्यांच्या प्रत्येक कृतीतून झळकत असे. दुर्दैवाने त्यांचा मुलगा

मुलगा स्वर्गवाशी झाला, मुलाच्या दुःखा ने महाराज वेडेपिसे झाले, ते मनाने व शरीराने खचले, तशातच आजारी पडले, त्यांना आपला मृत्यू डोळ्या समोर दिसू लागला, त्यांना राज्याचा वारस हवा म्हणून त्यांना कारभारी मंडळींनी दत्तक पुत्र घेण्याची विनंती केली. तत्कालीन कायदे व ईतर सर्व अटी पूर्ण करून त्यानी दामोदर नावाच्या मुलाला दत्तक घेतले.मात्र काही दिवसानंतर गंगाधरराव महाराज स्वर्गवाशी झाले. महाराजांच्या निधनानंतर लक्ष्मीबाई झाशी राज्याची धुराअत्यंत समर्थपणे सांभाळू लागल्या. परंतु तत्कालीन इंग्रज सरकारला राणी लक्ष्मीबाईचे वर्चस्व सहन होईना,त्यांनी लक्ष्मीबाई यांना त्रास देण्यास आरंभ केला.भारतातील इंग्रजांचा गव्हर्नर लॉर्ड डलहौसी याने हिंदुस्थानातील निपुत्रिक राजांची राज्ये खालसा करण्याचे फर्मान काढले.देशातील सर्व राज्ये आपल्या अधिपत्याखाली घेण्याचा त्यांचा डाव होता.परंतु राणी लक्ष्मीबाईने इंग्रजांना ठणकावून सांगितले की,'मेरी झाशी नही दुनंगी'कारण श्रीमंत गंगाधररवानी कायदेशीर रित्या दत्तक विधान



केलेले होते, मात्र हे दत्तक विधान इंग्रजांना मान्य नव्हते. इंग्रजांचे झाशीचे राज्य खालसा केल्याचे पत्र मिळताच,राणी लक्ष्मीबाईने इंग्रजांशी निकराचा लढा देण्याचा निर्णय घेतला. त्या उद्गारल्या',मी अस्सल मराठा आहे,ज्या कोणाची हिम्मत असेल त्यांनी या मर्द मराठ्या स्त्रीवर चालून यावे,त्यांना मराठा तलवारीचे पाणी पाजल्याशिवाय राहणार नाही'.१८५७चा उठाव ही याच दरम्यान झाला.या उठावाने लक्ष्मीबाईना स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित झाल्याची जाणीव झाली,झाशीत ही अनेक क्रांतिकारकानी इंग्रज अधिकारी व सैनिकांना ठार केले.देशात क्रांतीचा डोंब उसळला होता, इंग्लंडहुंन सैन्य मागविले,झाशी वर ही सैनिकांनी चाल केली,या वेळी लक्ष्मीबाईनी, अंगावर योध्याचा पोशाख चढविला, चिमुकल्या दामोदरला पाठीशी बांधले व मैदानात उतरून शेकडो इंग्रजांना ठार केले, पण सैन्य खूप होते, त्यांचा घोडा भरधाव धावू लागला,व लक्ष्मीबाई सपासप वार करून अनेक इंग्रजांना यमसदनी पाठवू लागल्या.त्याचं समयी एका इंग्रज सैनिकाचा वार, त्यांच्या डोक्यावर पडला.

पण त्याही स्थितीत त्यांनी शेकडो इंग्रज सैनिकांची मुंडकी धडावेगळी केली त्या खूप थकल्या होत्या, क्षीण झाल्या होत्या,त्यांना आपला मृत्यू डोळ्यासमोर दिसू लागला.तेव्हढ्यात त्यांना समोर आपला विश्वासु सैनिक दिसला त्या शेवटचे शब्द उच्चरल्या'माझ्या देहाची विटंबना होऊ देऊ नये,एव्हढे बोलून राणी ने दामोदरच्या तोंडावरुन हात फिरविला व गतप्राण झाल्या. एका महान क्रांती देवतेने शेवटच्या श्वासपर्यंत लढा दिला, व राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा दाखविली,अशा त्या क्रांती देवतेच्या स्मृतींना कोटी ,कोटी प्रणाम.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

## शेडनेट अनुदान रखडल्याने शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

# २८ लाखांचे कर्ज घेऊन उभारले शेडनेट; तीन महिने उलटूनही अनुदान नाही

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) - एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत शेडनेट गृह उभारलेल्या शेतकऱ्यांचे अनुदान रखडल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर मंगळवारी (दि. १६) आमरण उपोषण सुरू केले. प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करावे तसेच उपविभागीय कृषी अधिकारी डॉ. आनंद गांजेवार यांच्यावर जाचक अटी घातल्याचा आरोप करत त्या रद्द कराव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन छेडण्यात आले आहे.

उपोषणाला भगूर येथील जनार्दन चव्हाण, अनिल चव्हाण, मारोती चव्हाण, गणेश चव्हाण, विजय काळे, अमोल बुट्टे, ज्ञानेश्वर चव्हाण, योगेश जाधव, अमित गायकवाड, प्रशांत गायकवाड, किशोर जाधव आदी शेतकरीही समर्थनार्थ बसले आहेत. शेतकरी कल्याण चव्हाण, भाऊसाहेब काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२४-२५ मध्ये शेडनेट योजनेसाठी अर्ज करून विभागाकडून पूर्वसंमती मिळाल्यानंतर त्यांनी सुमारे २८ लाख रुपयांचे कर्ज उचलून शेडनेट गृहाची उभारणी केली. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणीही केली. आवश्यक कागदपत्रे आणि ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करून महाडीबीटी पोर्टलवर लाभार्थी पात्र असल्याचे दर्शविले जात असतानाही तीन महिन्यांहून अधिक कालावधी लोटूनही अनुदानाची रक्कम खात्यावर जमा झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. शेडनेट उभारणीसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा वाढता बोजा सहन करावा लागत असून, पुढील हंगामासाठी बियाणे, खते आणि इतर कृषी निविष्ठांच्या खरेदीचे नियोजनही अडचणीत आले आहे. वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने मिळत असल्याने मानसिक ताण वाढल्याचे आंदोलक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



### अधिकाऱ्यांशी चर्चा निष्फळ; शेतकरी उपोषणावर ठाम

दरम्यान, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी आणि विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा केली. मात्र, चर्चेत कोणताही ठोस निर्णय न झाल्याने शेतकरी आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

**शेकडो शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली** - दरम्यान ही केवळ दोन शेतकऱ्यांची समस्या नसून जिल्ह्यातील अनेक शेडनेटधारक शेतकऱ्यांचे अनुदान प्रलंबित असल्याचा दावा उपोषणकर्त्यांनी केला. आम्ही प्रातिनिधिक स्वरूपात आंदोलन करत असून शेकडो शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडत आहोत, असे त्यांनी सांगितले.

# सुपर अल-निनो म्हणजे समस्याही सुपर !

**आपल्या** देशात १९७२ साली सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. त्याकाळी हवामानाचा वेध घेण्यासाठी उपग्रह यंत्रणा तसेच वातावरणात होणारे बदल याची माहिती जवळपास नव्हती. दुष्काळ आला इतकच ज्ञान सर्वांना होतं . आता बदलत्या तंत्रामुळे एल निनो अन् सूपर अल निनो याची माहिती खूप आधी आपणास झाली आहे. १९७२ सालचा दुष्काळ सर्वांना यासाठी स्मरणात आहे की, त्याकाळी मोठ्या प्रमाणावर अन्नटंचाई निर्माण झाली होती.

शेतीचे उत्पादन नगण्य झाल्याने खाण्यासाठी धान्य नाही अशी स्थिती असल्याने अमेरिकेतून आपणास धान्य मागवावे लागले होते. नंतरच्या काळात तांत्रिक आणि यांत्रिक प्रगती झपाट्याने झाली असली तरी समस्या कमी झालेली नाही. उलट समस्येचे स्वरूप खूप बदलले आहे आणि गंभीर झाले आहे. याची आपणास जाणीव असणे गरजेचे आहे. १९७१ साली भूजल उपशाचे प्रमाण नगण्य होते आणि लोकसंख्या देखील मर्यादित होती. मात्र गेल्या ५ दशकात शहरीकरण झपाट्याने झाले आणि लोकसंख्या देखील झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे यावेळी पिकांचे संकट अधिक पेयजलाचे संकट असे दुहेरी संकट आपणासमोर आहे. यांत्रिकीकरणात झालेली वाढ आणि ऊस, कापूस या सारख्या नगदी व नफा देणाऱ्या पिकांकडे शेतकरी वर्ग वळला, यामुळे भूजल ऊपसा प्रचंड प्रमाणात सुरू आहे. धरणे जरी बांधली गेली असली तरी त्या धरणाच्या पाण्याचा वापर उद्योग , कृषी आणि पेयजल असा विभागला आहे. नागरिकांच्या पेयजलाची काळजी घेण्यासाठी ठराविक क्षम तेनंतर कृषीला अर्थात सिंचनाला पाणी दिले जात नाही. सध्या दोन नक्षत्रे कोरडी गेली असल्यानं हे संकट अधिक गहिरं झालं आहे. शेतकऱ्यांना निसर्ग जणू नाराज आहे आणि दुसऱ्या बाजूला आता सिंचनासाठी पाणी न देण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग अक्षरश: आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. अल-निनो समजून घेताना त्याच्या तांत्रिक बाबीत सांगता येईल की, प्रशांत महासागरात पाण्याचे तापमान सुमारे २ अंश सेल्सिअस वाढल्याने संपूर्ण निसर्गचक्र बदलले आहे.

**नेमेची येतो पावसाळा-** असं आपण म्हणतो पण यंदा त्याचा नेम चुकलाय आणि तो कधी आणि किती येईल हे सांगणे अवघड झालय. आलाच पाऊस तर नेमकेपणाने तो कुठे, कधी आणि किती पडेल हा देखील सवाल आहे. अशा पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गाला सातत्याने हवामान खात्याचा इशारा बघा, माहिती घ्या आणि पेरणी करण्याबाबत घाई करू नका असा झाला आहे.

अल निनोची स्थिती निसर्गत: दर काही काळाने येते मात्र त्याचं गांभीर्य वाढत आहे याचं एकमेव कारण म्हणजे आपण चालवलेला नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर होय. मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड ही जगासमोरील एक मोठी समस्या आहे. सोबतच जंगलांना लागणारी आग अर्थात वन-वणव्यात नष्ट होणारी जंगले यामुळे पृथ्वीवरील वृक्षाच्छादन झपाट्याने घटताना दिसत आहे. २०१५ च्या फ्रान्स करारानुसार कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा निर्णय झाला परंतु यातून अमेरिकेने माघार घेतली. त्यासोबतच जगभरात जिवाश्म इंधन अपरिमितरित्या वापरले जात आहे. यातून होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाचा परिणाम वैश्विक पातळीवर होत आहे. मोठमोठ्या हिमनद्या तसेच अर्क्ट्रीक व अंटार्टिका मधील बर्फ वेगाने वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे. याचा धोका थेट पूर्ण पर्यावरणास आहे. आपण आपल्या महत्वाकांक्षा आणि पैशाच्या बळावर नैसर्गिक संसाधनं ओरबाडत आहोत, असेच म्हणावे लागेल.पाऊस कमी, दुष्काळ, पाऊस जास्त, अतिवृष्टी, आणिबाणीची स्थिती हे एक चक्र आहे. शासन यात दिलासा नक्की देत आहे पण निसर्ग हा निसर्ग आहे.

Nature is biggest leveler... अशी उक्ती आहे. निसर्ग कोपला तर काय यावर डिस्कव्हरी वाहिनीने Raging Planet नावाची मालिका बनवली आहे ती आपण बघितली पाहिजे. आपण निसर्गाचाच एक घटक आहोत, आधी बुद्धीमत्ता आणि आता आलेली कृत्रिम बुद्धीमत्ता यांच्या बळावर आपण निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. परंतु हे सर्व प्रयत्न एका फटक्यात आपणास काय स्थितीत नेवून पोहोचवतील याचाही अंदाज हवा आणि जाणीव हवी. आपण निसर्गाचं खूप काही देणं लागतो.

पुढच्या पिढीलाही वसुंधरा सुखरूप देणं हे आपलं कर्तव्य आहे. आपण एक सुरेख ब्लु प्लॅनेट Blue Planet नव्या पिढीला देणार की एक Raging (खवळलेला) Planet याचाही निर्णय आपणास घ्यायचा आहे. अल निनोच्या संकटावर मात करताना आगामी काळात प्रत्येकाने आपली भूमिका समजून आपले कर्तव्य मानून योग्य कृती न केल्यास काळ कठीण आहे. वेळीच सावध व्हाः! अद्याप सुरूवातच झालीय पण उशीर झालेला नाही.

**- प्रशांत दैठणकर** ९८२३१९९४६६

# 'झाल्टा फाट्यावर MD ड्रग्जसह दोघे जेरबंद; ग्रामीण पोलिसांची ७.३९ लाखांच्या मुद्देमालासह मोठी कारवाई'



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत ६२.२७ ग्रॅम मेफेड्रोन (एम डी) पावडरसह दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत वाहन, मोबाईल, वजनकाटा आणि रोख रक्कम असा एकूण ७ लाख ३९ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार दोन व्यक्ती एमडी ड्रग्ज विक्रीसाठी झाल्टा फाटा परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला.

१५ जून रोजी सायंकाळी झाल्टा फाटा येथे बीडकडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयित कार (MH 14 HU 0639) अडवून तपासणी करण्यात आली. झडतीदरम्यान वाहनातून ६२.२७ ग्रॅम मेफेड्रोन पावडर आढळून आली. या पदार्थाची किंमत सुमारे २ लाख ४९ हजार ८० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अर्जुन मिट्टी साबळकर (वय २८, रा. पाचोड, ता. पैठण) आणि नरेश मांगीलाल बिश्नोई (वय २९, मूळ रा. जालोर, राजस्थान, सध्या पाचोड) अशी आहेत.

या प्रकरणी चिकलठाणा पोलीस ठाण्यात छउझड कायद्याच्या कलम 8(c), 22(c) व २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने, महसूल विभागाचे अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग आणि FSLपथकाच्या उपस्थितीत केली. अंमली पदार्थांच्या विळख्यातून समाजाला मुक्त करण्यासाठी पोलिसांची ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.

# वैजापूर महाराणा प्रतापसिंह जयंती तसेच राजमाता जिजाऊ व राणी लक्ष्मीबाई पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



वैजापूर, दि. १७ (प्रतिनिधी) - येथील पालिकेच्या पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात बुधवार (ता.१७) रोजी हिंदवी सूर्य वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह जयंती निमित्त व राजमाता जिजाऊ माँ साहेब व रणरागिणी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुण्यतिथी निमित्त संयुक्तिक अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत याप्रसंगी प्रमुख अतिथी होते, त्यांनी विद्यार्थ्यांना या तिन्ही वीरांविषयी कवितेच्या माध्यमातून व प्रश्नोत्तर चर्चेतून सखोल माहिती दिली.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका नीता पाटील होत्या. सूत्रसंचलन शिक्षक बी. बी. जाधव यांनी केले. आभार सुभाष गोमलाडू यांनी मानले. या प्रसंगी संदीप शेळके, श्री.तगरे, क्रीडा शिक्षक श्री. बोढरे, राजश्री बंड, सुवर्णा बोर्डे, लता सुखासे, ज्योती दिवेकर, वैशाली शेलार, सुनीता वसावे, तारा होलप, पल्लवी भाकरे याच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या विविध योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१७ (प्रतिनिधी) - महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या येथील जिल्हा कार्यालयामार्फत २०२६-२०२७ या आर्थिक व अनुदान योजना, बीजभांडवल योजना (रु. १ लाख पर्यंत) आणि थेट कर्ज योजनांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील मांग, मातंग, चांभार व खाटीक वगळून इच्छुक अर्जदारांनी ऑगस्ट २०२६ अखेरपर्यंत महामंडळाच्या http://mahadisha.mpbcdc.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करण्याबाबत महात्मा फुले मागासह विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक एस. एन कराड यांनी केले आहे.

अनुदान व बीजभांडवल योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा जास्त नसावे, तर थेट कर्ज योजनेसाठी अर्जदाराचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे. योजनेबाबत सविस्तर माहिती व अर्जासाठी अर्जदारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस.एन. कराड यांनी केले आहे.

निश्चित उद्दिष्टापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास संगणकीय रँडमायझेशन प्रणालीद्वारे किंवा लॉटरी पद्धतीने अर्जदारांची निवड केली जाईल. तसेच, ज्या अर्जांची निवड होणार नाही, ते अर्ज रद्द करण्यात येतील, असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

# महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन




छत्रपती संभाजीनगर, दि.१७ (प्रतिनिधी)- थोर सेनानी शूरवीर महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी(सामान्य शाखा) श्रीमती संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रुपेश सिंगारे, उपविभागीय अधिकारी कन्नड संतोष गोरड यांच्या हस्ते प्रतिमापुजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# 'द डेमन ऑफ ड्रॉट'ची एंट्री! 'रणबाली'मधील अर्नोल्ड व्हॉसलू यांचे दमदार पात्र झाले रिव्हील

'रणबाली'च्या निर्मात्यांनी चित्रपटातील हॉलिवूड स्टार अर्नोल्ड व्हॉसलू यांचा कॅरेक्टर पोस्टर रिलीज केला आहे. भारताच्या इतिहासातील काही अनोळखी आणि सत्य घटनांपासून प्रेरित असलल्या या ऐतिहासिक चित्रपटात विजय देवरकोंडा एका निर्भय योद्धयाच्या भूमिकेत, तर रश्मिका मंदाना 'जायम्मा'च्या भूमिकेत दिसणार आहे. 'रणबाली' ११ सप्टेंबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे.

'रणबाली' हा यावर्षीचा सर्वाधिक प्रतीक्षित पॅन-इंडिया चित्रपटांपैकी एक आहे. मायथ्री मूव्ही मेकर्सच्या बॅनरखाली बनत असलेल्या या ऐतिहासिक चित्रपटात विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. भव्य वर्ल्ड-बिल्डिंग, दमदार पात्रांचे रिव्हील आणि उत्कृष्ट संगीत अशा प्रत्येक अपडेटमुळे चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.

हीच उत्सुकता अधिक वाढवत निर्मात्यांनी हॉलिवूड स्टार अर्नोल्ड व्हॉसलू यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा एक जबरदस्त कॅरेक्टर पोस्टर रिलीज केला आहे. कल्ट हिट 'द ममी' फ्रँचायझीमध्ये 'इमहोटेप' ही आयकॉनिक भूमिका साकारण्यासाठी प्रसिद्ध असलेले व्हॉसलू या चित्रपटाद्वारे भारतीय सिनेमात पदार्पण करत आहेत. निर्मात्यांनी त्यांची ओळख 'द डेमन ऑफ ड्रॉट - सर थियोडोर हेक्टर' अशी करून दिली आहे. या इंटेन्स पोस्टरमध्ये ते अत्यंत प्रभावी अवतारात दिसत असून त्यांनी मेटॅलिक केप परिधान केलेली आहे आणि त्यांच्या मागे धुराचे वातावरण दिसत आहे. या पोस्टरवरून चित्रपटात त्यांची अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावी भूमिका असणार असल्याचे स्पष्ट




होते. पोस्टर रिलीज होताच सोशल मीडियावर त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. हा पोस्टर शेअर करताना निर्मात्यांनी लिहिले, 'द डेमन ऑफ ड्रॉट - सर थियोडोर हेक्टर. 'द ममी' मध्ये 'इमहोटेप'च्या भूमिकेतून जगभरातील प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या अर्नोल्ड व्हॉसलू यांचा आता श्ठरपरलररश्रळ मधील निर्दयी 'सर थियोडोर हेक्टर' म्हणून नवीन प्रवास सुरू होत आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि भारतीय सिनेमात तुमचे स्वागत. 'रणबाली' हा औपनिवेशिक काळाच्या पार्श्वभूमीवर आधारित भव्य ऐतिहासिक ॲक्शन-ड्रामा चित्रपट आहे. भारताच्या इतिहासातील काही कमी परिचित पण सत्य घटनांपासून प्रेरित असलेल्या या चित्रपटात विजय देवरकोंडा एका निर्भय योद्धयाच्या मुख्य भूमिकेत दिसणार आहेत, तर रश्मिका मंदाना त्यांच्या पत्नी 'जायम्मा'ची भूमिका साकारणार आहेत.

चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढवत चित्रपटातील रोमँटिक गाणे 'ओ मेरे साजन' मोठे हिट ठरले आहे. या गाण्यात चित्रपटाच्या भव्यतेसोबत विजय आणि रश्मिकाची अप्रतिम केमिस्ट्री पाहायला मिळते. सोशल मीडियावर या गाण्यावर १ लाखांहून अधिक रील्स तयार झाल्या असून यूट्यूबवर त्याला ३० लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. आता अर्नोल्ड व्हॉसलू यांच्या या दमदार कॅरेक्टर पोस्टरच्या रिव्हीलनंतर चित्रपटाबाबतची उत्सुकता आणखी शिगेला पोहोचली आहे.

राहुल संकृत्यान दिग्दर्शित आणि टी-सीरिजच्या सहकार्याने मायथ्री मूव्ही मेकर्सचे वाय. रविशंकर आणि नवीन यरनेनी निर्मित 'रणबाली'मध्ये रश्मिका मंदाना मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेत आहेत. विजय देवरकोंडासोबतची त्यांची लोकप्रिय जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. चित्रपटात आंतरराष्ट्रीय अभिनेता अर्नोल्ड व्हॉसलू यांच्यासह अनेक दमदार कलाकारांची फौज आहे, ज्यामुळे हा चित्रपट जागतिक स्तरावर अधिक खास ठरणार आहे. 'रणबाली' ११ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# अद्वित ज्वेल्स लिमिटेडचा आयपीओ मंगळवार, २३ जून २०२६ रोजी खुला होणार, प्रति इक्विटी शेअर १३० ते १३८ रुपये किंमत पट्टा निश्चित

- प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्ससाठी १३० रुपये ते १३८ रुपये प्रति इक्विटी शेअर असा किंमत पट्टा (इक्विटी शेअर्स)
- बिड/ऑफर सुरू होण्याची तारीख: मंगळवार, २३ जून २०२६, आणि बिड/ऑफर बंद होण्याची तारीख: गुरुवार, २५ जून २०२६.
- किमान बिड लॉट: १०० इक्विटी शेअर्स आणि त्यानंतर १०० इक्विटी शेअर्सच्या पटीत.

मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी) - अद्वित ज्वेल्स लिमिटेडने आपल्या पहिल्या आरंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी १०/- रुपये दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरसाठी १३०/- ते १३८/- रुपयांचा किंमत पट्टा निश्चित केला आहे.

कंपनीचा हा इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ किंवा इश्यू) सबस्क्रिप्शनसाठी मंगळवार, २३ जून २०२६ रोजी खुला होईल आणि गुरुवार, २५ जून २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १०० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १०० इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

आजच्या तारखेला कंपनीचे एकूण ३,३८,४२,००० आऊटस्टॅंडिंगइक्विटी शेअर्स आहेत (प्रत्येकी १० रुपये मूल्य आहे). हा आयपीओ १,१९,६८,००० इक्विटी शेअर्सचा नवीन इश्यू आहे.

या नवीन इश्यूमधून मिळणाऱ्या ६५ कोटी रुपयांच्या निधीचा वापर कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी, ६५ कोटी रुपये घेतलेल्या काही थकीत कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्व-परतफेड करण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी केला जाईल.

अद्वित ज्वेल्स ही कंपनी भारताचे रत्न आणि दागिन्यांचे केंद्र असलेल्या जयपूर, राजस्थान येथे स्थित आहे. ही कंपनी पारंपारिक आणि समकालीन हस्तनिर्मित उत्कृष्ट दागिन्यांची उत्पादक आणि विक्रेती असून, कुंदन, पोल्की, हिरे (डायमंड) आणि जडिताच्या दागिन्यांमध्ये तिचे विशेष प्राविण्य आहे. कंपनीचे ब्रँड नाव 'रामभाजो' हे आहे.

कुशल कारागिरीतील कंपनीचे नैपुण्य आणि ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडींची अचूक समज यांमुळे कंपनी पारंपारिक पद्धतींना आधुनिक डिझाईन्सची जोड देते; ज्यामुळे दागिने कालातीत आणि तितकेच प्रासंगिक वाटतात. त्यांचे दागिने जुन्या तंत्रांचा वापर करून तयार केले जातात, परंतु त्यात आधुनिक डिझाइन घटकांचाही समावेश केला जातो, ज्यामुळे प्रत्येक दागिना केवळ सुंदरच दिसत नाही तर समृद्ध सांस्कृतिक वारसाही दर्शवतो. याचा परिणाम म्हणजे हे दागिने सुबक, अर्थपूर्ण आणि क्लासिक तसेच आधुनिक अशा दोन्ही आवडींना आकर्षित करणारे ठरतात.

डिझाईन कल्पकता आणि कस्टमायझेशन (ग्राहकांच्या आवडीनुसार बदल करणे) ही कंपनीची मुख्य ताकद आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या विशिष्ट आवडीनुसार, सांस्कृतिक महत्त्वानुसार आणि बाजारातील ट्रेंडनुसार दागिने बनवून घेण्याची लवचिकता मिळते. वधूच्या कलेक्शनपासून ते दैनंदिन वापराच्या लक्झरी दागिन्यांपर्यंत, कंपनीची उत्पादने भारतीय बाजारपेठेतील विविध ग्राहकांच्या गरजा पूर्ण करतात.

गुणवत्ता, अस्सलपणा आणि ग्राहक समाधान याप्रती असलेल्या वचनबद्धतेसह, कंपनी हे सुनिश्चित करते की त्यांनी तयार केलेल्या प्रत्येक दागिन्यामध्ये सूक्ष्म कारागिरी, काळजीपूर्वक निवडलेले साहित्य आणि वारसा कलेची सखोल समज दिसून येईल. कंपनीच्या उत्पादनांमध्ये हार, कानातले, अंगठ्या, बांगड्या आणि कस्टमाइज्ड दागिन्यांचा समावेश आहे. कंपनी प्रामुख्याने सोने, हिरे आणि रंगीत रत्नांचे काम करते आणि कुंदन तसेच पोल्की कामासाठी ओळखली जाते.

जगातील वेगवेगळ्या ठिकाणच्या विविध कलाप्रकारांचे मिश्रण करून कंपनी दररोज नवनवीन डिझाईन्स तयार करते. त्यांचे प्रत्येक डिझाईन वैशिष्ट्यपूर्ण असते आणि ते पुन्हा बनवले जात नाही. ग्राहकांच्या पसंतीनुसार कंपनीची उत्पादने १४ कॅरेट आणि १८ कॅरेट सोन्यामध्ये डिझाइन केली जातात. कंपनी प्रामुख्याने B2B (Business-to-Business) मॉडेलवर काम करते, ज्यामध्ये ती डीलर्स, शोरूम आणि ज्वेलरी किरकोळ विक्रेत्यांना सेवा पुरवते. त्याच वेळी, कंपनी विशेष आणि ऑर्डरनुसार बनवल्या जाणाऱ्या दागिन्यांसाठी B2C (Business-to-Consumer) ग्राहकांनाही सेवा देते.

**उत्पादन क्षमता आणि पायाभूत सुविधा**

कंपनीचा उत्पादन विभाग जयपूर येथे ६,४५० चौरस फूट बांधकाम क्षेत्रात आहे आणि तो भाडेतत्त्वावर घेतलेल्या जागेवर कार्यरत असून त्याचे संपूर्ण व्यवस्थापन कंपनीद्वारे केले जाते. कंपनीची ही सुविधा कडक सुरक्षा मानकांचे पालन करते आणि 3D प्रिंटर, कास्टिंग युनिट्स व पॉलिशिंग मशीन यांसारख्या आधुनिक यंत्रांनी सुसज्ज आहे. कच्च्या सोन्याच्या प्रक्रियेपासून ते उत्पादनाच्या अंतिम फिनिशिंगपर्यंतची संपूर्ण उत्पादन साखळी एकाच छताखाली हाताळण्यासाठी कंपनीची रचना करण्यात आली आहे.

उत्पादनांचे प्रमाण आणि मागणी वाढल्यामुळे कंपनीची वर्षानुवर्षे वाढ होत आहे आणि सध्या जयपूर, राजस्थान येथे त्यांचे मुख्य स्टोअर बांधकामाधीन आहे. संपूर्ण उत्पादन प्रक्रिया एकाच छताखाली केंद्रित करून, कंपनी कामकाजाची कार्यक्षमता, कडक गुणवत्ता नियंत्रण आणि कमी वितरण वेळ सुनिश्चित करते.

वितळवणे, शीट आणि चेन बनवणे, खडे बसवणे पॉलिशिंग आणि गुणवत्ता तपासणी यापासून सुरू होणारी दागिन्यांची संपूर्ण उत्पादन प्रक्रिया कंपनी अंतर्गत पातळीवरच पार पाडते. कंपनीच्या एकूण मनुष्यबळामध्ये कुशल कारागिरांचा मोठा वाटा आहे आणि प्रत्येक दागिना तपासणीच्या अनेक स्तरांमधून जातो.

**आर्थिक कामगिरी आणि व्यवस्थापन**

३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या ९ महिन्यांच्या कालावधीसाठी कंपनीचे ऑपरेशन्समधून मिळालेले महसूल १,२३७.९ कोटी रुपये होते आणि निव्वळ नफा २५४.४ कोटी रुपये होता.

होलाणी कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेड हे या इश्यूचे बुक-रनिंग लीड मॅनेजर आहेत, आणि बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (Bigshare Services Private Limited) हे या ऑफरचे रजिस्ट्रार आहेत.

ही ऑफर बुक-बिल्डिंग प्रक्रियेद्वारे दिली जात आहे, ज्यामध्ये निव्वळ ऑफरच्या ५०% पेक्षा जास्त हिस्सा पात्र संस्थात्मक खरेदीदारांना दिला जाणार नाही.

तसेच निव्वळ ऑफरचा अनुक्रमे १५% पेक्षा कमी नसलेला हिस्सा बिगर-संस्थात्मक बोलीदारांना आणि ३५% पेक्षा कमी नसलेला हिस्सा किरकोळ वैयक्तिक बोलीदारांना वाटप केला जाईल.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# नीट परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज-जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दिनांक २१ जून २०२६रोजी 'नीट' परीक्षा आयोजित करण्यात आली असून, ती सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी यांनी सज्जता पूर्ण केली आहे. जिल्ह्यात एकूण ५० परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा संपन्न होणार असून, यासाठी प्रशासनाने नियोजन केले आहे सर्व नियुक्त अधिकारी यांनी समन्वयाने, जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात नीट परीक्षेच्या आयोजनासंदर्भात समन्वय समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी . जी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत परीक्षेचे नियोजन आणि सुरक्षेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यात ५० परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार असून यात शहरात ४७ आणि ग्रामीण भागातील तीन परीक्षा केंद्र असणार आहे.जिल्ह्यातील १७हजार ७३४ विद्यार्थी परीक्षा देणार आहे. दुपारी २:०० ते ५.१५ वाजता होणार आहे.प्रत्येक केंद्रासाठी स्वतंत्र केंद्र निरीक्षक, पोलीस बंदोबस्त अधिकारी आणि परीक्षा कार्यरत दंडाधिकारी यांच्या नियुक्ती करण्यात आली आहे.परीक्षा केंद्राच्या परिसरात सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाकडून ड्रोनद्वारे निरीक्षण केले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रेल्वे स्टेशन आणि बस स्टॅन्ड येथे महानगर पालिकेच्या विशेष बस ची व्यवस्था करण्यात आली आहे. दिव्याग व्यक्ती साठी परीक्षा केंद्रावर मदत आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

परीक्षा केंद्राच्या बाहेर विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक पद्धतीने तपासणी आणि उपस्थिती घेतली जाणार आहे. या प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहणे गरजेचे आहे. परीक्षा देणाऱ्या सर्व उमेदवारांनी प्रवेशपत्रावर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सर्व नियुक्त अधिकारी आणि पोलीस प्रशासनाला आपापसात समन्वय ठेवून परीक्षा शांततेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

या बैठकीला पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव, पोलीस उपायुक्त श्री. रत्नाकर नवले, सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, नोडल अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, संतोष गोरड, विजय चव्हाण, प्रवीण फुलारी, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांच्यासह महावितरण विभाग आणि परीक्षा समन्वयक उपस्थित होते.

## बालमृत्यू रोखण्यासाठी मनपाची अतिसार नियंत्रण मोहीम सुरू

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार, मा. अतिरिक्त आयुक्त-२ श्रीमती कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. उज्वला भामरे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागाचा वतीने दि. १६ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत मनपा शहर हद्दीत अतिसार नियंत्रण मोहीम राबविण्यात येत आहे. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू रोखणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.




या मोहिमेचा शुभारंभ दि. १७ जून २०२६ रोजी एन-८ रुग्णालय येथे माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मेघा जोगदंड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. मनोज बजाज, डॉ. चंद्रकला गायकवाड, डॉ. वरद शिंदे, श्रीमती नंदा जाधव, श्रीमती सुनिता बुनगे, श्रीमती अनुसया सोनटक्के तसेच एन-८ रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

मोहिमेदरम्यान आशा सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील घरोघरी भेटी देऊन नागरिकांना स्वच्छता, सुरक्षित पाणी व अतिसार प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन व समुपदेशन करणार आहेत. तसेच ० ते ५ वर्षे वयोगटातील अतिसारग्रस्त बालक आढळल्यास त्यांना दोन ओआरएस पाकिटे व झिंकच्या १४ गोळ्यांचे विनामूल्य वितरण करण्यात येणार आहे. याशिवाय सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये ओआरएस कॉर्नरची स्थापना करण्यात येणार असून, अतिसार प्रतिबंध, परिसर स्वच्छता, हात धुण्याची शास्त्रीय पद्धत, ओआरएसच्या वापराबाबत जनजागृती तसेच ओआरएस तयार करण्याचे प्रात्यक्षिक नागरिकांना दाखविण्यात येणार आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात येत आहे.

## रोजगार मेळाव्यातून तरुणांना मिळाला रोजगार; २०७ उमेदवारांची निवड

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिकी एवं सुचना प्रौद्योगीकी संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जून २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील पंडीत दीनदयाल उपाध्याय NIELIT केंद्र येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यातून २०७ उमेदवारांची विविध नामांकित कंपन्यांसाठी प्राथमिक निवड करण्यात आली.

मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा कार्यालयाचे सहायक आयुक्त श्री. राजू वाकुडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बदलत्या रोजगार बाजारपेठेच्या गरजा ओळखून तरुणांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज आहे. त्यांनी शासनाच्या विविध कौशल्य विकास व उद्योजकता योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी श्री. भुजंग रिठे आणि श्री. सुरेश बहुरे यांनीही उमेदवारांना या सुवर्णसंधीचा उपयोग करून स्वतःची प्रगती साधण्याबाबत प्रोत्साहित केले.

मेळाव्यास ५४७ इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहून आपली नोंदणी केली होती. विविध आस्थापनांकडे एकूण ७६६ मुलाखती पार घेण्यात आल्या.मुलाखतीअंती २०७ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

या मेळाव्यात जिल्ह्यातील अनेक नामांकित नियोक्त्यांनी सहभाग घेत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आणि आपल्याकडील रिक्तपदांची माहिती दिली. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी NIELIT चे अधिष्ठाता अश्वनी कुमार टिक्कू, प्लेसमेंट अधिकारी सौरभ बनसोड, असिस्टंट प्रोफेसर योगेश शेजवळ तसेच कौशल्य विकास विभागाचे श्री. विरेंद्र चव्हाण, श्री. रामदास फुले, श्री. प्रविण डोंगरदिवे, श्री. शिवप्रसाद चिंचोले, श्री. प्रितम सोनवणे, श्री. अखिलेश इंगळे, श्री. विशाल वाघमारे आणि श्री. आदित्य चोपडे यांनी विशेष सहकार्य केले.

# शूरवीर महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त अभिवादन

## महाराणा प्रताप पुतळा परिसरात ध्वज स्तंभ व हाय मास्ट लावण्याचे सभापती यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज शूरवीर महाराणा प्रताप यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले. सिडको कॅनॉट येथील महाराणा प्रताप यांच्या अर्ध आकृती पुतळ्यास मा.स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.


यावेळी नगरसेवक शिवाजी दांडगे,गणेश नावंदर,नगरसेविका श्रीमती सुनीता सोळुंके,दया गायकवाड,मुख्य उद्यान अधिक्षक विजय पाटील,माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, संतोष कोठाळे, करण साळवे, जयंती समितीचे पदाधिकारी ,कार्यकर्ते नागरिक आदींची उपस्थिती होती. महाराणा प्रताप यांना अभिवादन करण्यात आल्या नंतर मा.सभापती यांनी पुतळा परिसराची पाहणी केली. यावेळी अभिवादनासाठी उपस्थित असलेल्या महाराणा प्रताप जयंती समितीचे कार्यकर्त्यांनी या ठिकाणी ध्वज स्तंभ व हाय मास्ट लावण्याचे मागणी केली. या नुसारसभापती यांनी या बाबत संबंधित अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



# पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करा-अनिल मकरिये

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील मोती कारंजा, गांधी नगर, औषधी भवन, दुल्हा-दुल्हन चौक, संभाजीपेठ, नाथ मार्केट आणि सेना भवन परिसरातील नालेसफाई कामांची स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

पाहणीदरम्यान नालेसफाईचे सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम अद्याप बाकी असल्याचे निदर्शनास आले. पावसाळ्यापूर्वी सर्व नालेसफाईची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.



तसेच नाल्यांमध्ये कचरा टाकणारे व सांडपाणी सोडणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले. मोती कारंजा, गांधी नगर, औषधी भवन आणि नाथ मार्केट परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचेही सांगण्यात आले असून, त्याद्वारे नाल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर लक्ष ठेवता येणार आहे.

पावसाळ्यात पाणी तुंबणे, नागरिकांना होणारा त्रास आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी नालेसफाईची सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश यावेळी देण्यात आले. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणी नाल्यांवर जाळ्या बसविणे, नाल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करणे आणि पावसाळ्यात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले.यावेळी उप आयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे,कार्यकारी अभियंता अनिल तनपुरे,उप अभियंता आरती नवगीरे,सहायक आयुक्त रमेश मोरे आदींची उपस्थिती होती.

शहरात स्वच्छता व सुशोभीकरण राखण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने विशेष प्रयत्न सुरू असून नागरिकांनीही स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## नेत्रतज्ञ वैद्यकीयअधिकारी डॉ.संजय साळवे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात




वैजापूर दि.१७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातील वैजापूरच्या उप जिल्हा रुग्णाल यातून नेत्रसेवेची ३३वर्ष सेवा करून नुकतेच सेवा निवृत्त झालेले वैद्यकीय अधिकारी डॉ.संजय साळवे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचा कार्यक्रम बुधवार(ता,१७) रोजी येथे त्यांच्या पत्नी सौ.'कुसुमताई संजय साळवे सह पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.अरविंद हरबडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आरोग्य समितीचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत होते.या द्वायांनी नेत्रतज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ.संजय साळवे यांच्या सेवेचा गौरव करून त्यांचा सेवा निवृत्ती नंतरचा काळ सुखी,समृद्ध, व निरोगी जावो अशा शुभेच्छा दिल्या. डॉ.साळवे यांच्या सेवेबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केला याचाही उल्लेख करण्यात आला.डॉ.साळवे यांनी आपल्या सेवेबध्दल मनोगत व्यक्त केले.बहारदार व शेर शायरी युक्त सूत्र संचलन क्ष-किरण अधिकारी किशोर वाघुले यांनी केले.

प्रास्ताविक शीतल बोढरे यांनी तर आभार अर्चना वाघ यांनी मानले.नर्सेस विभागातील विद्या महाडीकर,रुख्मिनी गवई, विजया जंगम, श्रीमती सातदिवे,माया केदारे, मनीषा गायकवाड तसेच विजय पाटील ,सर्वश्री चौधरी, मापारी, लक्ष्मीकांत दुबे,संजय सागरे,श्याम उचित,भास्कर दुधारे,नागे पाटील, शशिकांत पाटील यांनीही भेट वस्तू देऊन डॉ.साळवे यांना सेवा पूर्तीच्या शुभेच्छा दिल्या.

## रासायनिक खतासाठीची मोबाईल प्रणाली तात्पुरती स्थगित करा

### खा.डॉ. कल्याण काळे, खा.भुमरे यांची जे. पी. नड्डांकडे मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत असलेल्या 'फार्मवर्क फॉर फट्रीलायझर सेल' या मोबाईल आधारित खत बुकिंग प्रणाल ीमुळे शेतकरी व खत विक्रेत्यांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा ल ागत असल्याची बाब खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय रसायन व खत मंत्री जे. पी. नड्डा यांच्या निदर्शनास आणून दिली. यासंदर्भात आज बुधवार, दि. १७ जून २०२६ रोजी नवी दिल्ली येथे त्यांनी केंद्रीय मंत्री नड्डा यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे हे देखील उपस्थित होते.



खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात लागू करण्यात आलेल्या या मोबाईल आधारित प्रणालीमुळे शेतकऱ्यांना रासायनिक खत खरेदीसाठी अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागातील बहुतांश शेतकऱ्यांना या प्रणालीचा वापर करण्याबाबत पुरेशी माहिती व प्रशिक्षण उपलब्ध नसल्याने त्यांना कृषी सेवा केंद्रांवर वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. सर्व्हर समस्या, बुकिंग प्रक्रियेतील अडथळे, तांत्रिक त्रुटी तसेच वेळेत खत उपलब्ध न होण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहेत.

खरीप हंगाम हा शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालावधी असून या काळात शेतकऱ्यांना वेळेत रासायनिक खते उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत मोबाईल प्रणालीमधील अडचणींमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम व असंतोष निर्माण झाला असून शेतीच्या कामांवर परिणाम होण्याची शक्यता वाढली आहे, असेही खासदार डॉ. काळे यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय मंत्री नड्डा यांच्याकडे 'फार्मवर्क फॉर फट्रीलायझर सेल' ही प्रणाली सध्याच्या खरीप हंगामातील महत्त्वाचा कालावधी संपेपर्यंत तात्पुरती स्थगित करण्यात यावी, अशी ठाम मागणी केली. तसेच या काल ावधीत प्रणालीतील तांत्रिक त्रुटी, सर्व्हर समस्या, शेतकरी व खत विक्रेत्यांना येणाऱ्या व्यावहारिक अडचणी यांचा सखोल अभ्यास करून आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात व त्यानंतरच सुधारित स्वरूपात ही प्रणाली पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

किसान हिताला सर्वोच्च प्राधान्य देत शेतकऱ्यांना वेळेत व विनाअडथळा रासायनिक खते उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केली. या विषयावर केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी सकारात्मक दखल घेत संबंधित बाबींचा आढावा घेण्याचे आश्वासन दिल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

(पान १ वरुन)

### उद्धव ठाकरेंचे सहा खासदार....

तिकीट मिळणार, असा शब्द संजय दीना पाटील यांना भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून हवा आहे. याच कारणामुळे संजय दीना पाटील यांनी अद्याप सही केली नसल्याची माहिती समोर येत आहे. बुधवार रात्रीपर्यंत जर भाजपकडून असा शब्द आला नाही तर संजय दीना पाटील हे गुरुवारी होणाऱ्या ठाकरेंच्या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, संजय दीना पाटील यांनी अरविंद सावंत यांच्याशी फोनवरून संपर्क साधला आहे. पत्रकार परिषदेत संजय दीना पाटील यांचे नाव घेऊ नका असं अरविंद सावंत यांनी मला माहिती दिली. मी जात नाही असं संजय दीना पाटील यांनी स्पष्ट केले आहे. एकमेकांविषयी संशयाचे वातावरण असू नये त्यामुळे आम्ही उद्याच्या बैठकीची वाट पाहतोय. ही बैठक कायदेशीर मार्गाने व्हीप जारी करून बोलावली आहे. बैठकीला काय चित्र आहे हे सगळ्यांसमोर स्पष्ट होईल. जर उद्या सर्व लोक तिथे असतील तर मी माफी मागायलाही तयार आहे. उद्याची बैठक आमच्यासाठी महत्त्वाची आहे असं ठाकरेंच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सांगितले.

### देशात हुकमशाही आणण्याचा...

विचारले असता चव्हाण म्हणाले, ''ऑपरेशन लोटस, टायगर, लायन... मला या जनावरांची नावे माहिती नाहीत. पण शिवसेना उद्धव ठाकरे गटात फूट पडल्याच्या बातम्या समोर येत आहेत. नऊपैकी सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र दिले आहे. त्यामुळे पक्षात विभाजन झाल्याचे स्पष्ट दिसत आहे.''

पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी भाजपच्या राजकीय उद्दिष्टांवरही प्रश्न उपस्थित केले. ''नरेंद्र मोदी सरकारला परिसीमन प्रक्रियेद्वारे उत्तर भारतीय राज्यांचे वर्चस्व वाढवायचे आहे. महिला आरक्षणाच्या नावाखाली संविधानात मोठे बदल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. देशात एका व्यक्तीची हुकूमशाही निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू असून लोकशाहीच्या दृष्टीने हा काळा दिवस आहे,'' असा आरोप त्यांनी केला.

### काँग्रेस भाजपची 'ए टू झेड' टीम,...

अष्टिकर यांचा मुलगा आहे, जे भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे) मध्ये सामील होण्याच्या तयारीत आहेत. अष्टिकर हे तेच उमेदवार आहेत, ज्यांच्या विरोधात भाजपने रामदास पाटील सुमठंकर यांना उमेदवारी मागे घेण्यास सांगितले होते, ज्यानंतर नागेश पाटील विजयी झाले, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे.

या घटनांचा संबंध, काँग्रेसचा पहिला उमेदवार भाजपशी संलग्न उमेदवार होता. काँग्रेसची दुसरी पसंती अशा नेत्याचा मुलगा आहे, जो भाजप आघाडीकडे झुकत आहे आणि ज्याला भाजपने लोकसभा निवडणुकीत विजयी होण्यास मदत केली होती, अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

### उबाठा संपवण्याचा विडा...

सर्व होत आहे. उबाठातील आमदार खासदार संजय राऊताच्या वक्तव्यांवर अतिशय नाराज आहेत. परवा त्यांनीच वक्तव्य केलं प्रादेशिक पक्षांनी राष्ट्रीय पक्षात आपला पक्ष विलीन करावा. आम्हाला असाच समज आहे ते शिवसेना उबाठा लवकरच काँग्रेसमध्ये विलीन करतील. आष्टीकर यांच्याबाबत सांगायचं झालं तर दोन घरात दोन मतं प्रवाह असू शकतात यांच्या आधीही अशी अनेक उदाहरणं आहेत. मतभिन्नता असू शकते. खैरेंबाबत सांगायचं जिल्ह्यातील अंबादास दानवेंसोबतचं शितयुद्ध आम्ही जे पाहतो ते जर तिथे एकत्र राहिले तर चांगलं होईल असे जाधव म्हणाले.

### ऑपरेशन टायगर नव्हे,...

म्हटले की, ''लोकशाही व्यवस्थेची हत्या करण्याचे काम सुरू आहे. पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या आघाडीच्या या कृतीचा आम्ही तीव्र निषेध करतो.''

नाना पटोले यांनी भाजप आणि मुख्यमंत्रीपदाच्या काळातील राजकीय घडामोडींवरून गंभीर आरोप केले आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना पटोलेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. नाना पटोले म्हणाले, बावनकुळे यांना सगळं माहिती आहे. पण ते त्याबद्दल बोलत नाहीत. कारण त्यांनी जर खरं बोलायला सुरुवात केली, तर त्यांची खुर्ची टिकणार नाही.

शिवसेना ठाकरे गटातील खासदारांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांदरम्यान काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. लोकशाही ही केवळ निवडणुका जिंकण्याचे साधन नसून जनतेने दिलेला विश्वास आणि संविधानाने दिलेली जबाबदारी असल्याचे सांगत, विरोधी पक्षातील नेते आणि लोकप्रतिनिधी फोडण्याची भाजपची कार्यपद्धती लोकशाहीसाठी घातक असल्याचा आरोप त्यांनी केला.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या नावावर आणि भाजपविरोधी भूमिकेवर मतं मागून निवडून आलेले खासदार आता सत्ताधाऱ्यांच्या गोटात जात असतील, तर तो मतदारांशी केलेला विश्वासघात असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. जनादेश आणि पक्षनिष्ठा सत्तेच्या मोहासाठी विकणाऱ्यांना इतिहास माफ करणार नाही, असे सांगत त्यांनी जनतेनेही अशा लोकप्रतिनिधींना त्यांच्या निष्ठेबाबत जाब विचारण्याची गरज असल्याचे म्हटले.

### करार मला पसंत पडला नाही...

यांनी इराणला वर्तन व्यवस्थित करण्याचा अन्यथा हल्ला करण्याच्या संभाव्य धोक्याबाबत सूचित केले आहे. ट्रम्प जी७ बैठकीसाठी सध्या फ्रान्समध्ये आहेत. यावेळी त्यांनी इराणबरोबरच्या करारावर देखील भाष्य केले.

''हा अंतिम करार नाही, तो सामंजस्य करार आहे. आणि तो जर मला आवडला नाही तर, आम्ही पुन्हा त्यांच्यावर हल्ले करु, बॉम्ब वर्षाव करु'', असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. ''मला जर ते आवडले नाही. त्यांनी व्यवस्थित वर्तन केले नाही. तर, आम्ही त्यांच्या मध्यवर्ती भागात बॉम्ब वर्षाव करु. कारण गेली ४७ वर्षे त्यांचे वर्तन योग्य नव्हते'', असेही ट्रम्प यांनी पुढे स्पष्ट केले. ट्रम्प यांनी यावेळी या करार अतिशय मजबूत असल्याचा दावा देखील केला. ''कोणालाच माहिती नाही ते काय आहे, पण करार मजबूत आहे'', असे ट्रम्प म्हणाले.

### रविकांत तुपकरांच्या आंदोलनाचा...

उडाला. यावेळी आंदोलनस्थळी तैनात पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्याला तात्काळ ताब्यात घेतले, त्याच्या खिशातील आगपेटी जप्त केली. त्यामुळे संभाव्य भीषण दुर्घटना टळली. या घटनेने आंदोलनस्थळी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यानंतर बुलढाणा पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, १५ जुनापासून सुरु झालेल्या रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून जिल्हाभरात आंदोलक अधिक आक्रमक होत असल्याचे चित्र आहे. खामगाव येथे काल मध्यरात्री उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालय पेटविण्याचा प्रयत्न करण्यात आला.चिखली तालुक्यातील पेठ येथील पुलावर टायर जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. आज दुपारी जळगाव जामोद येथे शेतकरी तहसील कार्यालयाच्या इमारतीवर चढले, तर चिखली तालुक्यातील उदयनगर येथे आंदोलकांनी थेट पाण्याच्या उंच टाकीवर चढून आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली आहे.